## राशिभविष्य

**बुधवार ०६ मे २०२६**

**|| पंचांग ||**

आज मिती वैशाख कृष्ण चतुर्थी ०७.५४ पर्यंत नंतर पंचमी शके १९४८.चंद्र नक्षत्र मूळ. योग सिद्ध.चंद्र राशी धनु ,भारतीय सौर १६ वैशाख शके १९४८ बुधवार दिनांक ०६ मे २०२६. सूर्योदय ०६.०८ , सूर्यास्त ०७.०२ , चंद्रोदय ११.११ पीएम, चंद्रास्त ०९.१८ एएम राहू काळ १२.३५ ते ०२.१२,चांगला दिवस

**|| भविष्य ||**

**मेष** - प्रगती, उन्नती होईल.

**वृषभ**– यशाचे प्रमाण वाढते राहील .

**मिथुन** - जीवनसाथी चे उत्तम सहकार्य लाभेल.

**कर्क**- प्रॉपर्टीची कामे मार्गी लागू शकतील

**सिंह** - अनेकानेक मार्गाने धन आगमन होऊ शकते

**कन्या**- जवळचे प्रवास घडू शकतात.

**तुळ**- मनासारख्या घटना घडतील

**वृश्चिक** - आपल्या कार्यक्षेत्रात प्रगती होईल

**धनु** - क्रोधावर नियंत्रण हवे.

**मकर**- वादविवादा पासून दूर राहा.

**कुंभ**– पारिवारिक कार्यक्रमात पुढाकार घ्याल.

**मीन** - व्यवसायात अंदाज बरोबर ठरतील

# चिपळूणमध्ये आज नितीन बानगुडे पाटील यांचे विशेष व्याख्यान

**चिपळूण (प्रतिनिधी) :**



श्री सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, चिपळूण यांच्यावतीने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असून हे व्याख्यान बुधवार दि. ६ मे रोजी सायंकाळी ५:३० वाजता पार पडणार आहे. 'राष्ट्र पुरुषांचे आदर्श आणि नव्या पिढीची जबाबदारी' या विषयावर प्रा. नितीन बानगुडे पाटील मार्गदर्शन करणार आहेत.

कै. कमलाकरशेठ चितळे व्याख्यानमाला अंतर्गत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम नटश्रेष्ठ डॉ. काशिनाथ घाणेकर रंगमंच, इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्र, मार्कंडी, चिपळूण येथे होणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मोहन मिरगल, कार्याध्यक्ष रमण डांगे, सचिव प्रभंजन पिंपुटकर, तसेच खजिनदार चंद्रशेखर सावले हे असून कार्यक्रमाचे प्रायोजक प्रकाश देशमुख आहेत.

पान १ वरून

## महिनाभरात शेतकऱ्यांना कर्जमाफी

पंचनामे पूर्ण झाले आहेत. ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, त्यांना शासनाच्या नियमानुसार लवकरच भरपाईचे वाटप करण्यात येईल. शेतकरी हितासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

## गाव तिथे 'कृषी मित्र'!

परिषदेत दत्तात्रय भरणे यांनी या योजनेची सविस्तर माहिती दिली. राज्यातील शेतकऱ्यांना योग्य वेळी मार्गदर्शन, तसेच सरकारी योजनांची माहिती पोहोचवण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. भरणे यांनी सांगितले की, राज्यात शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी ११ हजार ५८७ कृषी पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचबरोबर 'आत्मा' योजनेअंतर्गत आता 'कृषी मित्र' किंवा 'शेतकरी मित्र' नेमण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**प्रत्येक गावात एक कृषी मित्र**

राज्य सरकारने प्रत्येक गावात किमान एक कृषी मित्र नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. या पदासाठी अनुभवी, प्रयोगशील आणि नवीन तंत्रज्ञान स्वीकारणाऱ्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे.नियुक्त करण्यात येणारा कृषी मित्र हा संबंधित सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांसोबत काम करणार आहे. यामुळे शेतकऱ्यांपर्यंत योजनांची माहिती आणि तांत्रिक सल्ला अधिक जलद आणि प्रभावीपणे पोहोचवता येणार आहे.

या योजनेअंतर्गत कृषी मित्रांना वर्षाला १८ हजार रुपये मानधन देण्यात येणार आहे. हे मानधन दर तीन महिन्यांनी वितरित केले जाईल. ही योजना १ जूनपासून सुरू करण्याचा सरकारचा मानस आहे.पहिल्या टप्प्यात ११ हजार ५८७ कृषी मित्रांची नियुक्ती करण्यात येणार असून ही प्रक्रिया जिल्हास्तरावर राबवण्यात येईल, असेही भरणे यांनी स्पष्ट केले.

या योजनेमुळे शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन अधिक सुलभ होईल, तर ग्रामीण भागातील तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

**पात्रतेच्या अटी आणि महिलांना प्राधान्य**

कृषी मित्र पदासाठी काही निकष निश्चित करण्यात आले आहेत. उमेदवाराचे वय ४० वर्षांपेक्षा कमी असावे, संवाद कौशल्य चांगले असावे आणि समाजकार्याची आवड असावी. तसेच सोशल मीडियाचा वापर करता येणे आवश्यक आहे. किमान माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण असणे गरजेचे आहे. विशेष म्हणजे, या योजनेत ३० टक्के महिलांना प्राधान्य दिले जाणार आहे.

## लैंगिक अत्याचारातील आरोपींना पॅरोल देऊ नका !

काळ तो अमलातही होता; परंतु नंतर तो न्यायालयाने रद्दबादल केला. आता यावर कोणताही पर्याय नसताना पुन्हा नव्याने कठोर कायदा तयार करावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी विधी व न्याय विभागाला दिले आहेत.

नसरापूरमधील दुर्दैवी घटनेबाबत मुख्यमंत्र्यांनी स्वतः पीडितेच्या वडिलांशी दोन वेळा संवाद साधला आहे. याविषयी माहिती देताना ते म्हणाले, अशा नराधमाला भरचौकात फाशी दिली जावी, अशी भावना सर्वांचीच असते. मात्र, लोकशाही कायद्याने चालते. त्यामुळे कायद्यात कोणतीही पळवाट न ठेवता या नराधमाला मृत्यूदंडाची शिक्षा होईल, यादृष्टीने राज्य सरकार प्रयत्नशील आहे. या प्रकरणाचे दोषारोपपत्र (चार्जशीट) वेळेत दाखल करून हा खटला उच्च न्यायालयाच्या माध्यमातून जलदगती न्यायालयात (फास्ट ट्रॅक) चालवला जाईल. तसे लेखी आश्वासन पीडितेच्या कुटुंबालाही देण्यात आले आहे.

**काय घडले होते नसरापूरमध्ये?**

पुण्यातील नसरापूर येथे सुट्टीनिमित्त आजीच्या घरी आलेली चार वर्षांची चिमुकली १ मे रोजी घराच्या अंगणात खेळत होती. त्यावेळी ६५ वर्षीय आरोपीने तिला वासरू दाखवतो सांगून गोठ्यात नेले आणि तिच्यावर अमानुष लैंगिक अत्याचार केले. इतक्यावरच तो थांबला नाही, तर क्रूरतेची हद्द ओलांडत त्याने चिमुकलीला दगडाने ठेचून ठार मारले आणि पुरावा नष्ट करण्यासाठी तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपवून पळ काढला. या नराधमाला नागरिकांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. या अमानुष घटनेनंतर राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

## श्वास कोंडल्याने पीडित चिमुकलीचा मृत्यू

बंद होऊन श्वास घेण्याची प्रक्रिया बिघडते. यामुळे मेंदू, इतर अवयवांना पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही, त्यामुळे व्यक्तीच्या जिवाला धोका निर्माण होतो. श्वासात अडथळा आल्याने किंवा ऑक्सिजनचा पुरवठा कमी झाल्याने शरीरात ऑक्सिजनची तीव्र कमतरता निर्माण होते. त्यामुळे अनेकदा बेशुद्धी येते किंवा मृत्यू ओढवतो.

**७ मे पर्यंत पोलीस कोठडी**

दरम्यान या प्रकरणाचा जलदगतीने तपास करण्यासाठी पुणे ग्रामीण पोलीस दलाने सहा अधिकाऱ्यांचे पथक तयार केले आहे. पुण्यातील भोर तालुक्यातील नसरापूर परिसरात साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करण्यात आल्याची घटना शुक्रवारी १ मे रोजी उघडकीस आली. या प्रकरणात ६५ वर्षीय आरोपी भीमराव कांबळेला अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्याला ७ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## इराणच्या हल्ल्यात तीन भारतीय जखमी

भारताने स्पष्ट केले. फुजैराह पेट्रोलियम इंडस्ट्रीज झोनवर केलेल्या हल्ल्यात तीन भारतीय नागरिक जखमी झाल्याची घटनेचा निषेध करणारे निवेदन परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी प्रसिद्ध केले. तीन भारतीय नागरिक जखमी झालेल्या फुजैराहवरील हल्ला पूर्णपणे अस्वीकार्य आहे. आम्ही हे शत्रुत्व आणि नागरी पायाभूत सुविधा तसेच निष्पाप नागरिकांना लक्ष्य करणे त्वरित थांबवण्याचे आवाहन करतो, असे जयस्वाल यांनी निवेदनात म्हटले आहे.

मध्य पूर्वेत शांतता आणि स्थैर्य निर्माण होण्यासाठी भारत नेहमीच चर्चेतून मार्ग काढण्यासाठी प्राधान्य देईल, अशी भूमिकाही परराष्ट्र मंत्रालयाने या निवेदनाद्वारे स्पष्ट केली आहे. आंतरराष्ट्रीय कायद्यांनुसार होर्मुझ सामुद्रधुनीतून सुरक्षित वाहतूक पूर्ववत व्हावी अशी मागणीही भारताने केली आहे. शांततेतून मार्ग काढण्यासाठी भारत सर्व आवश्यक सहकार्य करण्यासाठी तयार असल्याचेही भारताने स्पष्ट केले.

**पंतप्रधान मोदींकडून निषेध**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील तीव्र शब्दात या हल्ल्यात भारतीय नागरिक जखमी झालेल्या घटनेचा निषेध केला. "नागरिकांना लक्ष्य करणे आणि पायाभूत सुविधांवर हल्ला करणे अस्वीकार्य आहे. भारत युएईबरोबर खंबीरपणे उभा असून, शांततेतून मार्ग काढण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यास तयार आहे. होर्मुझमधून सुरक्षित आणि विनाअडथळा वाहतूक होणे प्रदेशातील शांतता, स्थैर्य आणि जागतिक उर्जा सुरक्षेसाठी महत्वाचे आहे, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

**इराणकडून खंडन**

संयुक्त अरब अमिराती देशाकडून या हल्ल्याबाबत माहिती देण्यात आली आहे. हवाई सुरक्षा प्रणालीमध्ये १५ क्षेपणास्त्र डागल्याचे दिसून आले. इराणकडून चार ड्रोन सोडण्यात आले होते. यापैकी एक ड्रोन फुजैराह पेट्रोलियम इंडस्ट्रीज झोनवर आदळला यामुळे सर्वात मोठ्या तेल प्रक्रिया प्रकल्पात आग लागली, यात याठिकाणी काम करणारे तीन भारतीय नागरिक जखमी झाले आहेत. इराणने मात्र, हा हल्ला त्यांच्याकडून करण्यात आला नसल्याचे स्पष्ट केले. तेहरानच्या माध्यमांनी देखील हल्ल्याच्या वृत्तांचे खंडन केल्याचे समोर आले आहे.

## अमेरिकेने होर्मुझ सामुद्रधुनीत इराणच्या सात युद्धनौका केल्या उद्ध्वस्त

सामुद्रधुनीतून प्रवास केला आहे, परंतु इराणने हा दावा फेटाळून लावला. इराणच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की त्यांनी अमेरिकेच्या युद्धनौकेवर इशारा देणारे गोळीबार केले होते, मात्र, वॉशिंग्टनने हे वृत्त फेटाळले आहे. तर यूएईने म्हटले आहे की त्यांच्या सरकारी तेल कंपनीशी संबंधित एका टँकरला सामुद्रधुनीत धडक देण्यात आली. दक्षिण कोरियानेदेखील जवळच असलेल्या त्यांच्या एका जहाजावर स्फोट झाल्याचे वृत्त दिले आहे. यूएईच्या अधिकाऱ्यांनी हवाई संरक्षण दलाने १२ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे, तीन क्रूझ क्षेपणास्त्रे आणि चार ड्रोन लक्ष्य केल्याचे म्हटले. तर अबू धाबीने या हल्ल्यांना धोकादायक वाढ म्हटले असून प्रत्युत्तर देण्याचा अधिकार राखून ठेवल्याचे सांगितले.

## सावर्डे येथे भीषण साखळी अपघात; भरधाव ट्रकची ८ वाहनांना धडक; दोघे जखमी

पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आबासाहेब पाटील आपल्या पथकासह तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी वाहतूक सुरळीत करत जखमींना मदत केली. याप्रकरणी सावर्डे पोलिसांनी ट्रक चालक कन्हालाल मोतीलाल याला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या अपघाताचा पुढील तपास महिला पोलीस हवालदार स्नेहा घोसाळकर करत आहेत.

## पनवेलमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'स्कायला ॲक्वेरियम आणि सी लायन मनोरंजन केंद्र'

सागरी आणि अंतर्जल परिसंस्थेच्या विकासासाठी अत्यंत योग्य असून, सुमारे १० एकर क्षेत्रावर हा प्रकल्प उभा राहणार आहे. यामध्ये जागतिक दर्जाचे सागरी व गोड्या पाण्यातील जीवसृष्टीचे प्रदर्शन आणि सी लायन शोसारखे रोमांचक उपक्रम पर्यटकांना पाहायला मिळतील. या बैठकीला मत्स्यव्यवसाय विभागाच्या आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, महाराष्ट्र मत्स्यउद्योग महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**पर्यावरण आणि पर्यटनाचा संगम**

मंत्री नितेश राणे यांनी बैठकीत बोलताना सांगितले की, पनवेल हे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जवळ असल्यामुळे, देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करणे अतिशय सुलभ होईल. या केंद्राच्या माध्यमातून मनोरंजनच नव्हे, तर पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचा अभ्यास आणि शैक्षणिक विकासालाही मोठी मदत होणार आहे. यासाठी प्रकल्पाच्या व्यवहार्यता अभ्यासाला गती देण्याचे आणि तज्ज्ञांचा सल्ला घेण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## 'पोचिशे बोईशाख'ला नव्या सरकारचा शपथविधी?

मानले जात आहे. महिला सक्षमीकरण आणि पक्षातील वाढती लोकप्रियता ही त्यांची जमेची बाजू ठरत आहे. ममता बॅनर्जींसारख्या खंबीर महिला नेत्याला पर्याय म्हणून अग्निमित्रा पॉल यांचे नाव चर्चेत आहे. २५ नोव्हेंबर १९७४ रोजी जन्मलेल्या अग्निमित्रा पॉल या डॉ. अशोक रॉय यांच्या कन्या आहेत. त्यांनी वनस्पतीशास्त्रात पदवी घेतल्यानंतर फॅशन टेक्नॉलॉजीमध्ये डिप्लोमा आणि एमबीएचे शिक्षण पूर्ण केले आहे. राजकारणात येण्यापूर्वी त्या कोलकाता येथे एक प्रसिद्ध फॅशन डिझायनर होत्या. त्यांचा 'इंगा' हा ब्रँड प्रचंड लोकप्रिय होता. तसेच 'कोई मेरे दिल से पूछे' आणि 'व्हाया दार्जिलिंग' या चित्रपटांसाठी त्यांनी काम केले आहे.

## थलपती विजय 'किंगमेकर'च्या शोधात!

संपादन केला. टीव्हीके पक्षाने १०८ जागा जिंकल्या असल्या तरी पक्ष बहुमतापासून दूर आहे. सत्ता स्थापनेसाठी विजय यांना छोट्यामोठ्या पक्षांना बरोबर घ्यावे लागणार आहे. शिवाय युती सरकार स्थापन करण्यासाठी आता टीव्हीकेकडून काँग्रेसबरोबर बोलणी सुरु केल्याची माहिती समोर आली आहे.

थलपती विजय विरोधी पक्षांसोबत युती करण्याची योजना आखत आहे. टीव्हीके काँग्रेससह विदुथलाई चिरुथैगल कची, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) आणि इंडियन युनियन मुस्लिम लीग यांच्याशी युतीबाबत चर्चा करण्याची तयारी करत आहे. या पक्षांना लवकरच चर्चेसाठी निमंत्रण पाठवले जाईल, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. तमिळनाडूमध्ये स्टॅलिन यांचा द्रमुक पुन्हा सत्ता स्थापन करेल असा अंदाज जवळपास सर्व संस्थांच्या एक्झिट पोलमध्ये वर्तविण्यात आला होता. पण, यावेळी द्रमुकला केवळ ५९ जागांपर्यंत मजल मारता आली. दरम्यान, याबाबत काँग्रेस खासदार शशिकांत सेंथिल यांना विचारण्यात आले असता, "तमिळनाडूचे हित, पक्षातील सर्वांची मतं विचारात घेऊन निर्णय घेईल", असे त्यांनी म्हटले. "तमिळनाडूच्या निकालाचे सूक्ष्म विश्लेषण केले जाईल, पण राज्यातील जनतेने जो कौल दिला आहे तो आम्ही नम्रपणे स्वीकारतो", असेही सेंथिल पुढे म्हणाले.

**वरिष्ठ घेणार निर्णय**

विजय यांच्या टीव्हीकेबरोबर असलेल्या मतभेदांबाबत सेंथिल यांना विचारले असताना त्यांनी पक्षातील वरिष्ठ नेत्यांची चर्चा करण्याची गरज बोलून दाखवली. पक्षात अनेक मतमतांतरे आहेत. आम्हाला पक्षातील वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करावी लागेल. आम्ही संधीसाधू नाही. आमची विचारधारा आणि नागरिकांना दिलेल्या आश्वासनांशी आम्ही प्रामाणिक आहोत, अशी भूमिका सेंथिल यांनी मांडली. केंद्रीय नेतृत्व जो काही निर्णय घेईल, तो तमिळनाडूच्या जनतेच्या हिताचा निर्णय घेईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## 'नैतिकदृष्ट्या टीएमसी जिंकली, मी राजीनामा देणार नाही': ममता बॅनर्जी

मी निवडणूक हरलेली नाही. मी राजभवनात जाणार नाही. कारण हा प्रश्नच उद्भवत नाही. निवडणूक आयोगाशी संगनमत करून ते आम्हाला पराभूत करत असतील, पण नैतिकदृष्ट्या आम्ही निवडणुका जिंकल्या आहेत, असा अजब दावा ममता बॅनर्जी यांनी केला आहे.

पश्चिम बंगालच्या निवडणुकीच्या दोन दिवस आधी त्यांनी आमच्या अनेक लोकांना अटक करायला सुरुवात केली. अनेक ठिकाणी त्यांनी छापे टाकले. एवढंच नाही तर अनेक आयपीएस आणि आयएएस अधिकाऱ्यांनाही बदललं, त्यांनी त्यांच्या मर्जीतील लोकांना त्या ठिकाणी नेमलं आणि भाजपाने थेट निवडणूक आयोगाशी संगनमत करून हा खेळ खेळला, असाही आरोप ममता बॅनर्जी केला. त्यांनी एसआयआरच्या माध्यमातून तब्बल ९० लाख नावे वगळली आहेत. त्याविरोधात जेव्हा आम्ही न्यायालयात गेलो, तेव्हा ३२ लाख नावांचा त्यात समावेश केला. मी माझ्या आयुष्यात अशा प्रकारची निवडणूक कधीही पाहिली नाही, असेही ममता बॅनर्जी यांनी म्हटले. लोकांचे घटनात्मक हक्क आणि ईव्हीएम लुटून निवडणूक आयोग खलनायक बनले आहे. मतदानानंतर ईव्हीएम ८० ते ९० टक्के चार्ज कसे? असा सवाल करत ममता बॅनर्जी यांनी रडगाणे सुरू ठेवले आहे.

सोनिया गांधी, राहुल गांधी, अरविंद केजरीवाल, उद्धव ठाकरे, अखिलेश यादव, तेजस्वी यादव यांनी मला फोन केले. तसेच इंडिया आघाडीतील सर्व मित्रपक्ष पूर्णपणे माझ्याबरोबर असल्याचेही म्हटले. आगामी काळात आपली एकता आणखी मजबूत होईल. माझं ध्येय अगदी स्पष्ट आहे की मी एका सामान्य व्यक्तीप्रमाणे इंडिया आघाडी आणखी मजबूत करण्यासाठी प्रयत्न करेन. आता माझ्याकडे खुर्ची नाही म्हणून मी एक सर्वसामान्य व्यक्ती आहे. गेल्या १५ वर्षांत मी माझ्या पेन्शनमधून एक पैसाही घेतलेला नाही", असं ममता बॅनर्जी यांनी म्हटलं आहे.

## राजीनाम्यास नकार म्हणजे 'घटनेचा अपमान'

आरोप केला.

माझ्या राजीनाम्याचा प्रश्नच उद्भवत नाही, कारण आमचा पराभव जनतेच्या कौलने नाही तर एका कटामुळे झाला आहे. मी हरलेली नाही; मी राजभवनावर जाणार नाही. त्यांना काय घटनात्मक कारवाई करायची आहे ती त्यांनी करावी, असे ममता बॅनर्जी यांनी म्हटले. यावर भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी एक्सवर पोस्ट करत ममतांवर निशाणा साधला. ते म्हणाले की, ममता बॅनर्जींची ही भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या आणि संविधानाच्या विरोधी आहे. पूनावाला पुढे म्हणाले की, ममता बॅनर्जींनी राजीनामा दिला नाही, तरीही ८ मे रोजी विधानसभेचा कार्यकाळ संपणार आहे. त्यानंतर त्या आपोआप आपले सदस्यत्व गमावतील. जनतेच्या कौलचा आदर करण्याऐवजी त्या 'व्हिक्टिम कार्ड' खेळत आहेत आणि निवडणूक आयोगावर दोषारोप करत आहेत.

## चिपळुणात सती नाका परिसरातील दुकान फोडून चोरट्यांनी केली लाखो रूपयांच्या साहित्याची चोरी

रंगाचा इमर्शियन कंपनीचा कॉन्प्रेसर, २५ हजार रु. किंमतीचे एक राखाडी रंगाचे टुलकिट त्यामध्ये एसी, फ्रिज सर्व्हिसिंग करीता आवश्यक साहित्य, ६ हजार ५०० रु. किंमतीचा डीप-फ्रिजची सिल्व्हर कलरची क्वाईल, ६ हजार रु. किंमतीचा इलेक्ट्रेस कंपनीचा हिरव्या रंगाचा ब्लोवर, किको कंपनीचा लाल व काळ्या रंगाचा सर्व्हिस पंप व काळ्या रंगाचा वॉशिंग पाईप, ५ हजार रु. किंमतीच्या डीप-फ्रिजची सिल्व्हर कलरची कुलींग क्वाईल ७ हजार रु. किंमतीची काळ्या रंगाची केपेटी कंपनीची ड्रील मशीन, ३० हजार रु. किंमतीचे रेफ्रिजरेटचे तांब्याचे पाईपचे छोटे-छोटे तुकडे यांचा समावेश आहे.

या घटनेची नोंद दि. ४ मे २०२६ रोजी सकाळी ११.३८ वाजता करण्यात आली आहे. या चोरीच्या घटनेमुळे सती नाका परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## थिबा पॉईंट येथे किरकोळ वादातून मारहाण; तीनजण जखमी, एकावर गुन्हा दाखल

निवासस्थानासमोरील पार्किंग परिसरात घडली.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी करण सज्जन लाड (वय २६, रा. गलीस्तान अपार्टमेंट, नाचणे रोड, रत्नागिरी) हा आपल्या मित्रांसह पार्किंगमध्ये मोटारसायकलवर बसलेला असताना आरोपी आदित्य भिमराव कांबळे (वय १९, रा. पाडावेवाडी, मिरजोळे, रत्नागिरी) याच्याशी वाद झाला. फिर्यादीने "माझी व माझ्या वडिलांची बदनामी का करतोस?" अशी विचारणा केल्याने आरोपी संतप्त झाला.

रागाच्या भरात आरोपीने हातातील लोखंडी रॉडसदृश वस्तूने फिर्यादी करण लाड यांच्या ओठावर मारहाण केली. त्याला वाचविण्यासाठी पुढे आलेले साक्षीदार मार्विक संतोष नारकर (रा. शिवाजीनगर, रत्नागिरी) व वेदांत महेंद्र सावंत (रा. नाचणे, रत्नागिरी) यांनाही आरोपीने मारहाण केली. झटापटीदरम्यान वेदांत सावंत यांचा मोबाईल फोन फुटला, तर मार्विक नारकर यांच्या गळ्यातील चांदीची चेन देखील नुकसानग्रस्त झाली.

या घटनेत करण लाड, मार्विक नारकर व वेदांत सावंत हे तिघे जखमी झाले आहेत. याप्रकरणी दि. ४ मे २०२६ रोजी रात्री ७.०७ वाजता रत्नागिरी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा र. नं. १४४/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्यायसंहिता अधिनियम २०२३ अंतर्गत कलम ११८(१), ११५(२), ३५२ व ३२४(४) अन्वये गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

## इंडिगोच्या विमानात पॉवरबँकचा स्फोट : ५ प्रवासी जखमी

प्रवाशांना आपत्कालीन दरवाजातून बाहेर काढण्यात आले.

एअरलाईन्सननं दिलेल्या माहितीनुसार, फ्लाईट लँडिंगनंतर धावपट्टीवर उभं होतं.तितक्यात एका प्रवाशाच्या पॉवर बँकेनं पेट घेतला. सुरक्षेचा प्रश्न लक्षात घेता प्रवाशांना विमानातून तातडीनं बाहेर काढण्यात आलं. सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे टर्मिनलपर्यंत पोहोचवण्यात आलं. प्रवाशाच्या पॉवर बँकचा स्फोट झाल्यानंतर विमानात सर्वत्र धूर पसरला. त्यामुळे अन्य प्रवासी घाबरले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यात प्रवासी धावपट्टीवर उतरताना दिसत आहेत. 'सर्व प्रवासी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेला प्रथम प्राधान्य देण्यात आलं. विमानानं पुन्हा उड्डाण करण्याआधी त्याची पूर्ण तपासणी केली जाईल,' अशी माहिती एअरलाईन्सकडून देण्यात आली.

नागरी उड्डाण महासंचलनालयाच्या २०२६ च्या नियमांनुसार, विमानात पॉवर बँक नेण्याची परवानगी केवळ कॅरी ऑन सामानतच असते. प्रवाशांना फ्लाईटमध्ये फोन आणि अन्य डिव्हाईस चार्ज करण्यासाठी पॉवर बँकचा उपयोग करण्याची परवानगी आहे. पॉवर बँक आणि अतिरिक्त बॅटरी सारख्या वस्तू फ्लाईटमध्ये असलेल्या वरील कंपार्टमेंटला ठेवण्याची परवानगी नाही. कारण अशा ठिकाणी आग लागल्यास ती विझवणं अधिक अवघड असतं.

DGCA चे म्हणणे आहे की, हँड बॅगच्या आत किंवा ओव्हरहेड बिनमध्ये ठेवलेल्या बॅटरीजमध्ये धूर किंवा आग लागण्याची सुरुवात लगेच दिसत नाही, ज्यामुळे केबिन क्रूला वेळेवर प्रतिक्रिया देण्यास उशीर होऊ शकतो आणि प्रवाशांचा जीव धोक्यात येऊ शकतो.

## दिवाळीपूर्वी मंत्रिमंडळात फेरबदल?

मिळण्याची शक्यता असून, सध्या राज्यमंत्री म्हणून काम करणाऱ्या काही नेत्यांना कॅबिनेट पदावर बढती मिळू शकते. याशिवाय, आपल्या मतदारसंघात आणि जिल्ह्यात प्रभावी कामगिरी करणाऱ्या आमदारांनाही पहिल्यांदाच मंत्रिपद मिळण्याची शक्यता असल्याने इच्छुकांमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

कोणाला डच्चू मिळणार?

काही खात्यांमध्ये कामाचा वेग मंदावल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत. विशेषतः पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही मंत्र्यांच्या कामगिरीबाबत वरिष्ठ पातळीवर नाराजी असल्याचे बोलले जाते. तसेच, वादग्रस्त ठरलेल्या किंवा स्थानिक स्तरावर जनमानसात नाराजी निर्माण करणाऱ्या मंत्र्यांनाही बाहेरचा रस्ता दाखवला जाऊ शकतो.

## मुंबई-गोवा महामार्गावर आरवली घाटात डंपर उलटला; चालक जखमी

हा जयगड ते लोटे मार्गावर जात असताना आरवली घाटातील वळणावर अचानक झोका बसल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि डंपर पलटी झाला.

या अपघातात वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. वाहनामध्ये मोठ्या प्रमाणात बॉक्साइड रस्त्यावर उलटली असून वाहनांची कोंडी झाली होती. अपघाताची माहिती मिळताच उपस्थितांनी तत्काळ जखमी चालकाला ग्रामीण रुग्णालय, संगमेश्वर येथे दाखल केले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथे हलविण्यात आले. या प्रकरणी संगमेश्वर पोलीस ठाण्यात मोटार अपघात नोंद (क्र. ०८/२०२६) करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहेत. अपघाताबाबत भरत भुवाल यांनी खबर दिली आहे.

**छोट्या जाहिराती**

**पाहिजेत**

CA फर्ममध्ये Income Tax a Audit च्या कामासाठी मुले मुली पाहिजे आहेत. संपर्क सौ. राधिका श्रीरंग वैद्य पत्ता - सागरदर्शन, शिर्के हायस्कूल शेजारी, माळनाका रत्नागिरी

**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद रत्नागिरी**
**ई-निविदा सुचना क्रमांक ०७/२०२६-२७**

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद रत्नागिरी या विभागाकडील ई-निविदा (E-Tendering)सूचना क्रमांक ०७/२०२६-२७ शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आलेली आहे. ई-निविदे सुचनेमधील कामांकरीता महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील (जिल्हा परिषदेकडील) अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळातील नोंदणीकृत मक्तेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. निविदे संदर्भातील सविस्तर माहिती उपरोक्त शासन संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**क्र. रजिप/ग्रापापू/टेंडर/१५५५/२०२६**

**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद रत्नागिरी**
**दिनांक - ०५/०६/२०२६**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद रत्नागिरी**

**ग्रामपंचायत कार्यालय लोटे, ता. खेड, जि. रत्नागिरी.**

**जाहीर निविदा सुचना क्र. १ सन २०२६-२७**

ग्रामपंचायत लोटे, ता. खेड, जि. रत्नागिरी कडील खालील कामाची निविदा योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदारांकडून Percentage Rate Tender दोन लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाज-पत्रकीय रक्कम | निविदा रक्कम रूपये | निविदा फी रूपये | बयाणा रक्कम रूपये | सुरक्षा अनामत रक्कम | योजनेचे नाव वर्ष | कामाची मुदत | निविदा फॉर्म फी व मोहरबंद निविदा स्वीकारणेचा कालावधी | मोहरबंद लिफाफा उघडणेची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील शाम लाड यांच्या घरापासून ते रविंद्र घाग यांच्या घरापर्यंत (दिक्षितवाडी) रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | १००००००/- | १००००००/- | १०००/- | १००००/- | ४००००/- | जिल्हा वार्षिक योजना नागरी सुविधा २०२५-२६ | ३ महिने (पावसाळा वगळून) | ५/५/२०२६ ते १४/५/२०२६ वेळ सकाळी १० ते सायं. ५ पर्यंत | १५/५/२०२६ वेळ सकाळी ११.३० वाजता |

जा.क्र./निविदा ३/२०२५ ग्रा.पं. लोटे, ता.खेड, जि. रत्नागिरी दि. ०४/०५/२०२६
निविदेच्या अटी शर्ती ग्रा.पं. कार्यालय लोटे येथे कार्यालयीन वेळेत पाहणेस मिळेल.

शिक्का

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**

**सही/-**
**प्रशासक**

**ग्रामपंचायत कार्यालय लोटे,**
**ता. खेड, जि. रत्नागिरी.**

**punjab national bank**
Together for the better

**एआरएमबी मुंबई शहर**
यूबीआय टॉवर, ६ वा मजला, २५, सर पी. एम. रोड, फोर्ट, मुंबई – ४००००१. ई-मेल : cs6041@pnb.bank.in

**सरफेसी कायद्याच्या अंतर्गत सुरक्षित मत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८(६) वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

सूचना ह्याद्वारे सामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार (रां) आणि हमीदार (रां) ना देण्यात येत आहे की खाली वर्णन करण्यात आलेल्या मालमत्ता सुरक्षित धनकोकडे गहाण होत्या ज्याचा रचनात्मक/ प्रत्यक्ष/ सांकेतिक ताबा बँकेच्या/ सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारी ह्यांनी घेतला असून संबंधित कर्जदार (रां) आणि हमीदार (रां) कडून बँक/ सुरक्षित धनको ह्यांना देय असलेल्या त्यांच्या देण्याच्या वसुलीसाठी येथे खालील कोष्टकामध्ये नमूद करण्यात आलेल्या दिनांकाला "जसे आहे जेथे आहे तत्वावर", "जसे आहे तसे आहे तत्वावर" आणि "जसे आहे जेथे आहे तत्वावर" करण्यात येणार आहे. संबंधित मालमत्तेसमोर राखीव मूल्य आणि इसारा रक्कम ठेव नमूद करण्यात आली आहे.

...

| अनु. क्र. | कर्जदार (संस्थेचे नाव)/ सह-कर्जदार/ प्रोप्रायटर/ भागीदार/ संचालक/ हमीदार (रां)/ गहाणदार (रां) ची नावे | गहाण स्थावर मालमत्तेचे वर्णन / मालकाचे नाव (गहाण मालमत्ता) | ए) सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना दि. बी) १३(२)अनुसार शिल्लक थकीत रक्कम + व्याज आणि शुल्क सी) सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(४) अंतर्गत ताबा दिनांक डी) ताब्याचे स्वरूप: सांकेतिक/ प्रत्यक्ष/ रचनात्मक | ए) राखीव मूल्य (रु. मध्ये) बी) इरठे (शेवटचा दिनांक) सी) बोली वाढ रक्कम | ई-लिलावाचा दिनांक /वेळ | सुरक्षित धनकोला ज्ञात असलेला बोज्याचा तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एआरएमबी मुंबई शहर श्री. सुभाष रामचंद्र फणसमकर | एस क्र. ३०१, गट क्र. १९२५-ए/२, (जूना एस क्र. १९२५) बंगला क्र. १९, शांतीनगर, गाव लांजा, तालुका लांजा, जिल्हा रत्नागिरी ४१६७१२ | ए)१५.०९.२०२५ बी) ३१.०३.२०१८ अनुसार रु. ८३,३७,९७५.७० + त्यावरील व्याज आणि अन्य शुल्क सी) दिनांकित : १६.१२.२०२५ डी) सांकेतिक | ए) रु. ९२,८९,०००/- बी) ९,२८,९००/- २६/०५/२०२६ रोजी स. ११.०० वा. पर्यंत सी) रु. २५,०००/- | २६.०५.२०२६ स. ११.०० ते सायं. ४.०० वा. | ज्ञात नाही |

**अटी आणि शर्ती:**

१. विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ अंतर्गत विहित करण्यात आलेल्या अटी आणि शर्तींच्या आधारे आणि त्याशिवाय खालील शर्तींच्या आधारे असेल. २) मालमत्तांची विक्री "जसे आहे जेथे आहे तत्वावर" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" आणि "जसे आहे तेथे आहे तत्वावर" करण्यात येईल. ३) उपरोक्त परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आलेला तारण मत्तेचा तपशील प्राधिकृत अधिकारी ह्यांच्या कडे असलेल्या सर्वोत्तम माहितीच्या आधारे आहे, परंतु प्राधिकृत अधिकारी सदर घोषणेमधील कोणत्याही त्रुटी, गैर निवेदन किंवा काही गाळलेले असल्यास त्यासाठी जबाबदार राहणार नाहीत. ४) निम्नस्वाक्षरीकारांद्वारे https://baanknet.com संकेतस्थळावर उपरोक्त नमूद केल्यानुसार ई-ऑक्शन प्लटफॉर्मच्या माध्यमातून विक्री करण्यात येईल. ५) विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया www.baanknet.com आणि www.pnbindia.in चा संदर्भ घ्या. ६) संपर्क व्यक्ती – श्री सुशील कुमार – ८४२०१९४६७४, रिझवान अली- ७७६८९४१२५६ ७)बोलीदाराला उपरोक्त आयपीपैकी बोली लावत असल्यास त्यांना किमान बोली वाढ रक्कम आणि उपरोक्त निश्चित केलेल्या राखीव मूल्याच्या वर बोली लावावी लागेल.

सरफेसी कायदा २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत १५ दिवसांची संवैधानिक विक्री सूचना

दिनांक: ०६.०५.२०२६
ठिकाण: रत्नागिरी

सही/-
प्राधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक